जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५०२ दिनांक -०७ /०७/२०२३**

## समर्थ पोलिस स्टेशन पुणे शहर

# मोक्का गुन्हयातुन जामीनावर सुटुन पुन्हा घातक हत्याराने वार करुन पळुन गेलेल्या सराईत गुन्हेगार टोळीस अवघ्या ५ तासात अटक

दि.०५/०७/२०२३ रोजी भर दिवसा फिर्यादी अरबाज शेख यास आंदेकर टोळीतील मोक्का गुन्हयातुन जामीनावर सुटलेले आरोपी आवेज सैयद,अमन पठाण,जयमेश शिंदे यांचेत पुर्वी पासुन असलेला वाद मिटविण्यासाठी जात असताना भर दिवसा आरोपींनी धारदार हत्याराने वार करुन जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न करुन पळुन गेले.त्याबाबत समर्थ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५५/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७,३२४,५०४,५०६,३४ क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पळुन गेलेल्या आरोपींचा शोध घेत असताना तपास पथकाचे पोलीस नाईक रहिम शेख व पोलीस शिपाई हेमंत पेरणे यांना बातमीदारा मार्फत पळुन गेलेल्या आरोपींच्या ठिकाणाबाबत बातमी मिळाल्याने तपास पथकातील अधिकारी सुनिल रणदिवे यांना माहिती देवून तपास पथक अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी लपून बसलेल्या ठिकाणी जावून सापळा रचुन शिताफीने १) आवेज अशफाक शेख,वय २० वर्षे,रा. २७१ गणेशपेठ,बाबुभाईवाडा सागर हॉटेलजवळ,पुणे, २) अमन युसुफ पठाण उर्फ खान वय अंदाजे २२ वर्षे, रा.१३ नानापेठ,मांगवाडा,पुणे, ३) स्वप्नील प्रशांत शिंदे वय १८ वर्ष ०३ महिने रा.लेन नं.३,संभाजीनगर, धनकवडी पुणे **यांना अवघ्या ५ तासात पकडुन अटक करण्यात आली आहे.**

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ पुणे शहर,श्री.संदीपसिंह गिल्ल मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग,पुणे श्री.अशोक धुमाळ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,समर्थ पो.स्टे श्री.सुरेश शिंदे,पोलीस निरीक्षक,(गुन्हे) प्रमोद वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक सुनिल रणदिवे, पोलीस हवा.रोहिदास वाघिरे,गणेश वायकर,प्रमोद जगताप,पोलीस नाईक रहिम शेख,पोशि कल्याण बोराडे,अमोल शिंदे,शरद घोरपडे,संदिप पवार,ज्ञानेश्वर सुर्यवंशी,हेमंत पेरणे,लखन शेटे यांनी केली आहे.